# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर यांचे कार्यालय

**दुरध्वनी क्र.-0217-2342696**

**इ-मेल पत्ताः ddcahsolapur@gmail.com**

## द्रवनत्र वाहतुकीसाठी निविदा सूचना, सन २०१७-१८

महाराष्ट्रातून अगर महाराष्ट्र बाहेरील राज्यातील कुठल्याही ठिकाणाहून दि. १/२/२०१८ ते ३१/१/२०१९ या कालावधी करीता द्रवनत्र पात्रांमधुन द्रवनत्र भरुन आणून सोलापूर जिल्हयातील २१० कृत्रिम रेतन उपकेंद्रांना पुरवठा करण्याकरीता तसेच गरजेनुसार सांगणेत येणार तशा वाहतुकीसाठी कामाच्या स्वरुपानुसार व त्यातील अटी व शर्ती यांच्या अधिन राहून वाहनांचे कंत्राटदाराकडून ई-निविदा मागवित आहेत.

| अंदाजे मासिक वाहतूक (कि.मी.) | अंदाजे मासिक व्यस्तता | अपेक्षित वाहन क्षमता/प्रकार |
|---|---|---|
| ४००० कि.मी. | २० दिवस | टाटा ४०७/तत्सम |

निविदेसंदर्भातील कागदपत्रे, अटी व शर्ती यांची माहीती पाहण्यासाठी किंवा डाउनलोड करण्यासाठी**https://maharashtra.etenders.in** तसेच **https://adf.maharashtra.etenders.in**. या वेबसाइट उपलब्ध आहेत. दिनांक २/१/२०१८ रोजी १६.०१ वाजेपासुन दिनांक ९/१/२०१८ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत इलेक्ट्रॉनिक फॉरमॅटमध्ये **https://maharashtraet.enders.in**तसेच**https://adf.maharashtra.etenders.in**. या वेबसाइटवर सदरची निविदा भरता येणार आहे.

**निविदा उघडण्याचा दिनांक ११/१/२०१८**

**ठिकाण - मा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर यांचे कार्यालय.**

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**सोलापूर**

*अधिक माहितीसाठी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,नेहरू नगर सोलापूर येथे संपर्क करावा.

इ टेंडर नोटीस क्र.जिपउआ/तां/वाहतुक निविदा/१/२०१८ सोलापूर दिनांक ०१/१/२०१८

# जिल्हापशुसंवर्धन उपआयुक्त, यांचे कार्यालय अंतर्गत.

## जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर, जिल्हा सोलापूर

**या कार्यालयाच्या**

**दि. १/२/२०१८ ते ३१/१/२०१९ या कालावधीसाठी किंवा पुढील वर्षाची निविदा मंजुर होईपर्यंत राहील.**

---

## द्रवनत्र , द्रवनत्रपात्रे, इ. साहित्य वाहतूकीची ई-निविदा

---

**पृष्ठ क्रमांक १ ते १२.**

**महाराष्ट्र शासन**
**पशुसंवर्धन विभाग**
**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय , सोलापूर**
**दुरध्वनी क्र.-0217-2342696**
**इ-मेल पत्ता: ddcahsolpaur@gmail.com**

**ई निविदा**

**महाराष्ट्रातून अगर महाराष्ट्र बाहेरील राज्यातील कुठल्याही ठिकाणाहून दि. १/२/२०१८ ते ३१/१/२०१९ या कालावधी करीता द्रवनत्र पात्रांमधुन द्रवनत्र भरुन आणून सोलापूर जिल्हयातील २१० कृत्रिम रेतन उपकेंद्रांना पुरवठा करण्याकरीता तसेच गरजेनुसार सांगणेत येणार तशा वाहतुकीसाठी कामाची ई-निविदा( द्रवनत्रपात्र व रेतमात्रा वाहतुकीच्या कामाची ई -निवीदा)**

**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,**
**सोलापूर**

**निविदेचे नियम अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत..**

१) संपुर्ण निविदा प्रक्रिया ही ऑन लाईन ( ई - टेंडरिंग ) पध्दतीने राहिल.

२) निविदेसंदर्भातील कागदपत्रे ,अटी व शर्ती यांची माहिती पाहण्यासाठी किंवा डाऊनलोड करण्यासाठी https://maharashtra.etenders.inवhttps://adf.maharashtra.etenders.in या वेबसाईट वर दि. २/१/२०१८ रोजी १६.०१ वाजेपासून दि.९/१/२०१८ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहिल. ई-निविदा कालावधी – दि.१/२/२०१८ ते ३१/१/२०१९ किंवा पुढील वर्षाची निविदा मंजुर होईपर्यंत राहील.

३) निविदाधारकाने परीपुर्ण निविदा प्रसिध्दीचा दि. २/१/२०१८ रोजी सायंकाळी १६.०१ वाजेपासून दि. ९/१/२०१८ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंतइलेक्ट्रॉनिक फॉरमॅट मध्ये या वेबसाईट वर सादर करावयाची आहे. प्राप्त ई निविदा दिनांक ११/१/२०१८ रोजी ( शक्य झाल्यास ) मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, सोलापूर यांच्या उपस्थितीत व निविदा समितीतील सदस्यासमोर जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त , सोलापूर यांचे कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा उघडण्यासंबंधीची माहीती ही ई मेलव्दारे निविदाधारकास कळविणेत येईल . निविदाधारकाने संबंधित निविदा प्रक्रिया ऑन लाईन पध्दतीने सदर दिनांकास पाहावी याबाबत कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४) ई-निविदा फॉर्म वेबसाईटवर भरणेचा कालावधी दि.२/१/२०१८ रोजी सायंकाळी १६.०१ वाजेपासून दि. ९/१/२०१८ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत राहील.

५) निविदाधारकांनी ई-निविदा फॉर्मचे शुल्क रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र ) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) हे ऑनलाईन पध्दतीने बिड प्रक्रियेमध्ये (ऑनलाईन पेमेंट गेटवे) जमा करावयाचे आहेत.

६) निविदाधारकाने सर्व्हिस प्रोव्हायडरला शुल्क रुपये १०९२/- (अक्षरी रुपये एक हजार ब्यान्नव मात्र) बिड प्रोसेसमध्ये देणेचे बंधनकारक राहील.

७) ई-निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास, परंतु अन्य कारणांनी त्यांनी निविदा नाकारल्यास त्याची

बयाना रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

८) निविदा धारकाची स्वताची **डिजीटल सिगनेचर की** असणे बंधकारक राहील.



९) निविदा धारकांनी निविदा दोन बिड पध्दतीने ऑनलाईन सादर करावयाची आहे. तांत्रिक लिफाफयामधील सर्व कागदपत्रे ऑनलाईन भरावयाची आहेत. बीड प्रक्रिया करताना तांत्रिक व व्यापारी लिफाफयांसाठी Hash Value Generate करावा लागेल.

१०) याची नोंद घ्यावी की निविदा ऑनलाईन ओपन होताना सर्व प्रथम तांत्रिक लिफाफामधील प्रपत्रे पहिल्यांदा उघडण्यात येईल. तांत्रिक लिफाफयामध्ये सर्व कागदपत्रे पुर्णपणे सादर केल्यावरच व्यापारी लिफाफा ऑनलाईन उघडला जाईल.

११) निविदाधारकांनी माहिती भरताना दुर्लक्ष केल्यास किंवा पुर्ण माहिती न भरल्यास सदरची निविदा ऑनलाईन रद्द होईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**ई निविदा वेळापत्रक (Key Dates)**

| Departmental Stage | Vendor Stage | Start Date | Expiry Date |
|---|---|---|---|
| Release Tender | | 2/1/2018 11.00 | 2/1/2018 16.00 |
| Pre Bid Meeting | | 5/1/2018 15.00 | - |
| | Tender Download | 2/1/2018 16.01 | 9/1/2018 16.00 |
| | Bid Preparation | 2/1/2018 16.01 | 9/1/2018 16.00 |
| Close of Technical and commercial Bid | | 9/1/2018 16.01 | 9/1/2018 17.00 |
| | Bid Submition | 9/1/2018 17.01 | 10/1/2018 17.00 |
| Techinacal Bid Opening | | 11/1/2018 10.30 | 11/1/2018 17.30 |

| Price Bid Opening | | 11/1/2018 10.30 | 11/1/2018 17.30 |
|---|---|---|---|



१२) निविदेमध्ये खालील कागदपत्रांची **पीडीएफ फॉरमॅट** मध्ये पुर्तता करणे बंधनकारक राहील.

**नं.१- तांत्रिक लिफाफयातील सहप्रपत्रे-**

१) निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे पीडीएफ फॉरमॅट मध्ये निविदाधारकाचे लेटरहेडवर विहित नमुन्यातील संमतीपत्र

२) निवीदेच्या अंतीम तारखेपर्यत ग्राहय असलेले आयकर भरल्या संबंधीचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.

३) वाहनाचा विमा भरला असल्याची कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती.

४) वाहनकर पुस्तिका, पंजीकृत नोंदणी पुस्तिका (रजिस्ट्रेशन बुक )यांच्या साक्षांकित प्रती, माल वाहतुक परवाना,पी.यु.सी प्रमाणपत्र.

५) पॅन कार्ड प्रत व स्वतः च्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत अकांउट नंबर,बँक कोड व आयएफसी कोडसह.

६) बयाणा रक्कम म्हणून रु. १००००/- ( अक्षरी रु.दहा हजार मात्र ) व निविदा फॉर्म डाऊनलोडींग फी रु.२०००/-(अक्षरी रुपये दोन हजार मात्र) पेमेन्ट गेटवे द्वारे भरावे

**नं.२- व्यापारी प्रपत्र-**

१) दरपत्रक- वाहनाचा प्रति कि.मी. दर अक्षरी व अंकी नमूद करावा. सदर दर ऑनलाईन दरपत्रकामध्येच नमुद करण्यात यावा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सोलापूर, जिल्हा सोलापूर यांच्याकडे दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार राहील.

१३) निविदा धारकांनी निविदा रजिस्टर पोस्ट/स्पिड पोस्ट/कुरीयर द्वारे पाठविल्यास निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा त्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

१४) निविदा धारकांनी ई-निविदा फॉर्मचे शुल्क रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र ) व निविदा न भरताना बयाणा रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) हे ऑनलाईन पध्दतीने बिड प्रक्रियेमध्ये (ऑनलाईन पेमेंट गेटवे) जमा करावयाचे आहेत.

१५) निविदा दाखल करु इच्छिणा-या पुरवठादारास नमुना दाखल द्रवनत्रपात्र पाहण्यासाठी उपलब्ध राहील. त्यामध्ये उणे १९६ ° सेंटीग्रेड इतक्या थंड द्रवाची वाहतूक अतिशय काळजी पूर्वक करणे आवश्यक आहे. अशा एका भरलेल्या द्रवनत्रपात्राचे वजन अंदाजे ५० ते ६० कि.ग्रॅ. इतके असते.

१६) वाहनातील द्रवनत्र पात्रे ठेवण्याची जागा जाड चटईने आच्छादलेली असणे आवश्यक आहे. द्रवनत्र पात्रांचे ऊन, वारा, पाऊस या पासून संरक्षण व्हावे म्हणुन वाहनांवर योग्य उंचीचे हुड आणि त्यावर ताडपत्री सुस्थीतीत बांधलेली असणे आवश्यक आहे. वाहतुक करताना द्रवनत्रपात्रे ठेवण्यासाठी वाहनामध्ये योग्य उंचीवर अँगल लावून, दिड इंच जाडीच्या लाकडी फळया ठेकेदाराने स्वतःच्या खर्चाने बसवावयाच्या आहेत. वाहनास हि व्यवस्था नसल्यास ती वाहतूक कंत्राटदाराने त्वरीत करून दयावी.अन्यथा प्रत्येक वेळी कंत्राटदाराकडून प्रत्येकी रू १००/-चा दंड आकारला जाईल व हि रक्कम वाहतूक दाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

१७) वाहनाची मागील बाजू बंद करता यावी. मागील बाकावर पेटी नसावी.

१८) प्रत्येक फेरीच्या वेळी सांगितले जाईल त्या प्रमाणे एक किंवा दोन वाहने उपलब्ध करुन द्यावी लागतील तसेच पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र सोलापूर सांगतील त्याप्रमाणे इतर साहित्य सुध्दा सोबत न्यावे लागेल.

१९) वाहतूक कंत्राटदाराने वाहतूकीचा दर प्रति कि.मी. चा दिला पाहिजे. यासाठी वाहनाचे मिटर चालू स्थितीत असणे आवश्यक आहे. या मध्ये मुक्कामासाठी आकारणी करता येणार नाही. वाहतूक कमीत कमी अंतराच्या परंतु

चांगल्या मार्गाने करावी लागेल.

२०) कंत्राटदाराने वाहनाची देखभाल, दुरुस्ती राज्यांतर्गत किंवा राज्याबाहेरील कर अगर इंधन इत्यादी साठी खर्च स्वतः करावयाचा आहे. द्रवनत्र वाहतूक करतांना टोल टॅक्स द्यावा लागल्यास त्याचाही खर्च कंत्राटदाराने करावयाचा असून अशा कुठल्याही खर्चाची प्रतीपूर्ती शासनाकडून केली जाणार नाही.



२१) द्रवनत्र वाहतूक करते वेळी संबधित जिल्हा कार्यालयाचे २ ते ३ प्रतिनिधी वाहनासोबत न्यावे लागतील अशा स्वरूपाचा वाहनाचा परवाना असला पाहिजे व त्यांची सोईस्कर आसनव्यवस्था वाहनात असली पाहीजे. वाहनचालकाकडे पुरेशा क्षमतेची टॉर्च असणे आवश्यक आहे.

२२) कंत्राटदाराचे प्रतिनिधीने गाडीतील रिकामी द्रवनत्र पात्रे खाली उतरवून द्रवनत्र भरणे तसेच भरलेली द्रवनत्र पात्रे गाडीत चढवणे इत्यादी कामे अशा पध्दतीने करावीत की द्रवनत्र सांडणार नाही आणि द्रवनत्र पात्रांनाही इजा होणार नाही. या कामासाठी वेगळी अदायगी केली जाणार नाही.

२३) या निविदेत नमूद कामासाठी कुठल्याही प्रकारचे अग्रीमधन मंजूर केले जाणार नाही.

२४) द्रवनत्र वाहतूकीच्या दरास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये अपवादात्मक कारणा शिवाय कालावधीत वाढ करता येणार नाही परंतु कोणत्याही कारणासाठी दरवाढ केली जाणार नाही.

२५) पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर यांनी दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे वाहन संबंधित दिवशी विहीत वेळेवर उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास बाजारातून उपलब्ध दराने पर्यायी वाहनाची व्यवस्था केली जाईल व संबंधीत सर्व खर्च कंत्राटदाराच्या सुरक्षा ठेव / वाहतुक देयकातुन वसूल केला जाईल.

२६) वाहतूकीच्या सुरुवातीस जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर येथून एखादया वेळी रिकामी द्रवनत्र पात्रे नेवून ती पुरवठया च्या ठिकाणातून भरुन आणावी लागतील व नंतर जिल्हयातील संस्थांना दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे द्रवनत्र द्रवनत्र उपकेंद्रांना पुरवठा करुन रिकामी द्रवनत्र पात्रे जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर येथे आणून सुस्थितीत ताब्यात द्यावी लागतील. (रिकाम्या एका द्रवनत्र पात्राची किंमत रु. १५,०००/- ते २०,०००/- इतकी आहे.) वाहतूक संपलेनंतर दरमाह कंत्राटदाराने देयक सादर करावयाचे राहील. सर्व साधारण अंतराचा अंदाज घेऊन तसेच द्रवनत्र पुरवठयाचे अंतिम ठिकाण्याचे अंतराचे अंदाज घेऊन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर हे अंतिम मंजूरी देतील. त्यानुसार रक्कम अदा केली जाईल.

२७) पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर यांनी दिलेल्या कार्यक्रमानुसार द्रवनत्र आणणे, उपकेंद्रांना पुरविणे किंवा जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर येथून उपकेंद्रांना पुरवठा करुन रिकामी भांडी परत आणण्यासाठी कंत्राटदार याने वेळेवर कार्यवाही करणे आवश्यक राहील. तसेच पशुसंवर्धन खात्यातील इतर कामासाठी महाराष्ट्र राज्यात किंवा इतर राज्यात जाण्यास वाहन मागीतल्यास वाहन उपलब्ध करुन देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२८) वाहतूकीच्या वेळी प्रवासात ताब्यातील द्रवनत्र पात्रांचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे. प्रवासात द्रवनत्र पात्राचे, द्रवनत्राचे नुकसान कुठल्याही कारणाने झाल्यास आणि मनुष्यहानी झाल्यास त्यास कंत्राटदारास जबाबदार धरुन शासकीय नियमानुसार त्याची वसूली कंत्राटदाराकडून केली जाईल.

२९) वाहन द्रवनत्र पुरवठा करण्याचे कामासाठी असता कंत्राटदारास द्रवनत्रपात्रा व्यतिरिक्त इतर खाजगी सामान तसेच खात्याचे प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर खाजगी इसमांची वाहतूक करता येणार नाही.

३०) निविदा मंजूर झालेल्या कंत्राटदारास **रुपये २५,०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र ) अनामत रक्कम** म्हणून चलनाने कोषागार, सोलापूर येथे योग्य लेखाशिर्षाखाली भरुन चलनाच्या ३ प्रती जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर जिल्हा सोलापूर यांचेकडे देणे आवश्यक राहील.

३१) कंत्राटदाराने **रुपये २००/- (रुपये दोनशे मात्र) चे स्टॅम्प पेपरवर करारनामा** करुन द्यावा लागेल. हा करारनामा त्यांच्या दोन छायांकित प्रतीसह जिल्हा पशुसवंर्धन उपआयुक्त, सोलापूर, जि. सोलापूर यांचेकडे

द्यावयाचे राहील. मंजूरझालेल्या निविदा धारकाने करारनामा करतानाच नियम व अटी प्रमाणे वाहन तयार करुन समक्ष दाखविल्या शिवाय करारनामा केला जाणार नाही.

३२) **दिनांक ३१/१/२०१९ नंतर** पुढील कालावधीसाठी निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन अंतिम दर निश्चितीस मंजूरी मिळेपर्यंत कंत्राटदाराने जुन्या दरानेच वाहतुक करणे बंधनकारक राहील.



३३) निविदा मंजूर झालेल्या निविदा धारकाने दिलेल्या मुदतीत अनामत रक्कम **रुपये २५,०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र )** मात्र सरकारी खजिन्यात भरणा न केल्यास बयाणा रक्कम रु. १०,०००/- (अक्षर दहा हजार मात्र) जप्त करुन मंजूर झालेली निविदा नामंजूर समजण्यात येईल.

३४) कंत्राटदाराला यापासून होणा-या उत्पन्नावर शासकीय नियमानुसार प्राप्तीकर (इनकम टॅक्स)(TDS) भरावा लागेल. कंत्राट दाराला यापासून दिल्या जाणा-या अदायगीतूनच शासकीय नियमानुसार प्राप्तीकर (इनकम टॅक्स) (TDS) कापून घेतले जाईल.

३५) पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर यांना कंत्राटदाराचे वाहतूकीचे काम समाधानकारक नाही असे आढळून आल्यास तो कंत्राट काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे. कंत्राटदारा विरुध्द अशी कार्यवाही करावी लागल्यास त्याची अनामत रक्कम ही जप्त करण्यात येईल व शासकिय नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

३६) कंत्राट संबंधी काही विवाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर यांना राहणार असून, असे निर्णय कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

३७) वाहतूक करतांना कंत्राटदाराचे प्रतिनिधींनी काही गैरप्रकार केल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील व त्याचे विरुध्द शासकिय नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

३८) शासनाने घालून दिलेल्या वाहतूक संबंधीच्या नियम व अटी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. निर्देशित अटींचे व नियमांचे उल्लंघन झाले असे आढळून आल्यास कंत्राटदाराकडून कंत्राट काढून घेतले जाईल.

३९) कंत्राट स्विकारले नंतर केव्हाही मध्येच सोडल्यास भरलेली अनामत रक्कम रुपये **२५,०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र )**जप्त करण्यात येईल. तसेच त्या कारणाने नव्याने निविदा करावी लागल्यास "आणि/अगर" पर्यायी व्यवस्था करुन जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर यांना जादा खर्च करावे लागल्यास जादाची सर्व रक्कम कंत्राटदाराने भरुन द्यावी लागेल.

४०) ज्या कंत्राटदाराचे कंत्राट मंजूर होईल (ते बाहेरगावचे जरी असतील तरी सुध्दा ) त्यांनी स्वतःचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक व्यतिरिक्त सोलापूर येथील संपर्क पत्ता व दूरध्वनी क्रमांक ही देणे आवश्यक राहील.

४१) द्रवनत्र व इतर वाहतूकीच्या वेळी अपवादात्मक परिस्थितीत माल मिळण्यास काही विलंब झाल्यास त्याबद्दल मुक्कामी भत्ता (हॉल्टींग चार्जेस) मिळणार नाही.

४२) ठरवून दिलेल्या दिवशी द्रवनत्र आणणे, वाटप करणे वा इतर कामी कंत्राटदाराने सुस्थितीतील वाहन विहित दिवशी विहित वेळेवर उपलब्ध न करुन देता उशीर केल्यास त्याच्या कडून दर दिवशी रुपये १०००/-(रुपये एक हजार) मात्र या दराने दंड आकारणी करण्यात येईल.

४२) वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत निविदाधारकास साधरणतः २४ तास अगोदर सूचना देण्यासाठी त्यांनी या कार्यालयाच्या संपर्कात रहाणे आवश्यक आहे. जर सूचना देऊनही वाहन उपलब्ध न झाल्यास, निविदाधारकास प्रत्येक वेळी कमीत कमी रु.१००/- किंवा जास्त रु.१०००/- एवढा दंड आकारला जाईल व तो त्याचे देयकातून वसूल करण्यात येईल.तसेच यापुढील पाच वर्षापर्यंत या कार्यालयाने मागविलेल्या वाहतूक निविदांसाठी त्यास सहभागी होण्यास परवानगी दिली जाणार नाही.

४३) वेळोवेळी शासकीय नियमातील व शासकीय कार्यालयातील काही बदलांमुळे दिल्या जाणा-या सूचना व अटींचे पालन निविदाधारकास करावे लागेल.

४४) वाहतूक करीत असताना निविदाधारक अथवा त्याचे प्रतिनिधीकडून कोणत्याही प्रकारचा वाहन परिवहन किंवा पोलीस खात्याच्या कायद्याविषयक नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकावर

राहील. वाहन जप्त झाल्यास अथवा कार्यवाहीसाठी खोळंबून राहिल्यास वाहतुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन तातडीने उपलब्ध करुन देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

४५) वाहनाचे मीटर सुस्थितीत असणे आवश्यक आहे. वाटेतच किलोमीटर रिडींग बंद पडल्यास त्याच मार्गावरील मागील वाहतुकीचे किलोमीटर ग्राहय धरले जाईल. परंतु कंत्राटदाराने तातडीने मीटर चालू करून घेणे अनिवार्य राहील.



४६) संपूर्ण निविदा स्विकारणे, मंजूर करणे किंवा रद्द करणे किंवा कोणतेही कारण न दाखविता अमान्य करणे वगैरे सर्व अधिकार निविदा समितीस राहतील व समितीचा निर्णय निविदाधारकास बंधनकारक राहील.

४७) या कार्यालयाने ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतुक करणे बंधनकारक राहील अथवा अपवादात्मक परिस्थितीत वाहनांसोबत असणा-या अधिका-याचा निर्णय अंतिम राहील.

४८) निविदा उघडल्यानंतर प्रथम व द्वितीय क्रमांकावर असलेल्या निविदाधारकांच्या बयाना रक्कम एक महिन्याचे आत परत करण्यात येतील व इतरांचे बयाना रक्कम ताबडतोब परत करण्यांत येतील.

४९) द्रवनत्र वाहतुकीचे वेळी वाहतुक मार्गात उपकेंद्रांचे गावात व द्रवनत्र भरुन देणेचे ठिकाणी वाहन चालकाने घाई न करता सभ्यपणाने वागणे वाहनचालकास बंधनकारक राहील.

५०) वाहनाची देखभाल,दुरुस्ती ,रोडटॅक्स इत्यादी वाहनासाठी लागणारा खर्च कंत्राटदारानेच करावयाचा / सोसावयाचा आहे.त्यासाठी कोणत्याही प्रकारचा दाखला किंवा प्रमाणपत्र दिले जाणार नाही.निवीदा उघडण्याचे दिवशी वाहतुक करण्याचे वाहन व त्याची सर्व कागदपत्रे विम्यासहीत अद्ययावत निरीक्षणासाठी हजर करावी लागतील.

५१) वाहतुक कंत्राटदाराचा करारनामा लिहून दिल्याच्या तारखेपासून आणि अनामत रक्कम भरल्यापासून १ वर्षापर्यंत म्हणजे १ फेब्रुवारी २०१८ ते ३१ जानेवारी २०१९ अखेर पर्यंत कार्यान्वीत राहील.

५२) सोलापूर - पुणे- सोलापूर अथवा इतर कोठूनही व सोलापूर जिल्हयांतर्गत द्रवनत्र वाहतुकीस निघताना वेळ व वाहनाचे किलोमीटर रिडिंग मीटरवर त्यावेळी दाखवित असलेला किलोमीटरचा आकडा व द्रवनत्र वाहतुकीहून परत मुख्यालयात आल्यावर आल्याची वेळ व किलोमीटर आकडा यांची नोंद द्रवनत्र वाहतूक नोंदवहीमध्ये वाहनचालकाने/ठेकेदाराने ज्या त्या वेळी स्वतःच्या स्वाक्षरीने नोंद करणे बंधनकारक राहील व त्यास कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी साक्षांकीत करतील.

५३) निविदेमध्ये कोणतीही अट किंवा पर्याय निविदा धारकास देता येणार नाही. उपकंत्राट देता येणार नाही तसेच एकापेक्षा अधिक दर नमुद करता येणार नाहीत असे झाल्यास सदर निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५४) निविदा प्रक्रियेत ३ पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास अल्प प्रतिसादामुळे निविदेस पुन्हा मुदतवाढ देण्यात येईल ( फेरनिविदा सुचनेव्दारे ) अथवा संपुर्ण निविदा प्रक्रियाच रद्द करण्यात येईल याबाबतचे सर्व अधिकार मा. **जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,सोलापूर**यांनी राखून ठेवलेले आहेत

५५) संपूर्ण ई निविदा स्विकारणे, मंजूर करणे, रद्द करणे व इतर कोणतेही कारण न दाखविता मान्य न करणे वगैरे सर्व बाबतीत अधिकार निवीदा समितीकडे राहतील व समितीचा निर्णय ठेकेदारास बंधनकारक राहील. सदर निविदांबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण (कोर्ट मॅटर) झाल्यास सोलापूर येथील न्यायालयातच अपील करणे बंधनकारक राहील.

५६) यशस्वी निविदा धारकास निवीदा मंजूर झाल्यापासून सात दिवसाचें आत वाहतुकीच्या कार्यकृतिची हमी पूर्ण करणेबाबत करारनामा नियमानुसार २०० रुपयाच्या स्टँप पेपरवर लिहून द्यावा लागेल त्या शिवाय वहातुक ठेका मंजूर केला जाणार नाही.

५७) वाहतूक करणेसाठी योग्य वाहतूक क्षमता असलेले **पाच वर्षांच्या आतील नोंदणी असलेले टेम्पो वाहन असणे आवश्यक आहे.**

५८) जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नेहरुनगर, सोलापूर या कार्यालयासाठी महाराष्ट्रातील अथवा गरज पडल्यास इतर राज्यातून गरजेप्रमाणे द्रवनत्र आणणे व ते सोलापूर जिल्हाअंतर्गत २१० कृत्रिम रेतन उपकेंद्रांना ३०-३५ दिवसांच्या कालावधीत एकदा द्रवनत्र व वीर्यमात्रांचा पुरवठा प्रत्येक मार्गावर एकावेळी ५० ते ५१.५ लिटर क्षमतेची २० ते ४४ द्रवनत्र पात्रे वाहतुक करावयाची क्षमता असलेल्या वाहनातून पोहोचविणे जरुरीचे आहे.



५९) वाहतूक करीत असतांना वाहनात अचानक बिघाड झाल्यास त्याची दुरुस्ती ठेकेदारास स्वखर्चाने त्वरीत करावी लागेल. योग्य वेळेत दुरुस्ती न झाल्यास जर दुसरे वाहनाव्दारे वाहतूक करावी लागल्यास त्या वाहनाचे पूर्ण भाडे ठेकेदारास द्यावे लागेल.

६०) एकाच वेळी एकापेक्षा जास्त वाहने या कार्यालयाकरीता लागल्यास इतर सुस्थितीतील परिवहन नियम योग्य वाहने उपलब्ध करुन द्यावे लागतील. ही वाहने अशा वेळी मुख्य ठेकेदारा व्यतिरिक्त दुस-याची असू शकतील, मात्र वाहतूकीची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराचीच राहील. त्यासंबधीची भाडयाची रक्कम वाहतूक ठेकेदारास निविदेतील मंजूर दराप्रमाणेच अदा केली जाईल, जादा किंवा कमी आकार दिला जाणार नाही.

६१) संबधित वाहनासाठी आवश्यक असलेले इंधन, ऑईल, ग्रीस इत्यादी वाहतूक ठेकेदारास स्वखर्चाने भरावे लागेल व काही कारणाने इंधनाचे भाव वाढल्यास संबधित कार्यालय दरवाढ देणार नाही.

६२) द्रवनत्र वायू एका पात्रातून दुस-या पात्रात टाकताना सावधता बाळगावी. द्रवनत्र वायु निष्काळजीपणामुळे वाया गेल्याचे आढळून आल्यास त्याची भरपाई ठेकेदारास करुन द्यावी लागेल.

६३) ठेकेदाराने ठेका मंजूर झाल्यास, नियमाप्रमाणे काम करणे किंवा पार पाडण्याचे नाकारले तर त्याची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. त्याचशिवाय इतरास या कार्यालयाकरीता ठेका मंजूर करतांना जास्त दर मंजूर करावा लागल्यास, तर पूर्ण ठेक्याच्या रकमेतून फरकाची रक्कम ठेकेदाराच्या सुरक्षा ठेवीतून व स्थावर, जंगम मालमत्तेतून वसूल करण्यात येईल.

६४) निविदेसोबतच्या शासकीय अटी व शर्तीशिवाय ठेकेदारांनी दिलेली इतर कोणतीही अट स्विकारण्यात येणार नाही व तसा उल्लेख केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

६५) वाहनाचा वेग दर ताशी ४० किलोमीटर पेक्षा जास्त ठेवता येणार नाही. तसेच मद्यपान इत्यादी करुन चालक आढळल्यास व वाहनाच्या आवश्यक वेगमर्यादेचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास त्यास रु.१००/- ते रु.१०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल आणि मद्यपानाबाबत कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल. त्यामुळे शासकीय संपत्तीचे नुकसान झाल्यास ते ठेकेदारास भरुन द्यावे लागेल.

६६) हेच वाहन पशुसंवर्धन खात्याच्या इतर संस्थेच्या/योजनांतर्गत वाहतूकीकरीता लागल्यास उपलब्ध करुन द्यावे लागेल.

६७) जिल्हयांतर्गत व आंतरजिल्हा फिरतीची प्रतिमाह अपेक्षित धावसंख्या अंदाजे ४७०० किलोमीटर पर्यंत राहील.

६८) वाहतूकीच्या भावबंद दर कराराबाबतचे वाद व तक्रारीचे निवारण करण्याचे अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर यांना राहतील.

६९) संबधित वाहनासोबत वाहनाची कायदेशीर सर्व कागदपत्रे ठेवण्याचे बंधन ठेकेदारावर राहील.

७०) वाहतूकीच्या वेळी आवश्यकता भासल्यास खात्याचे अतिरिक्त प्रतिनिधी वाहनासोबत जाऊ शकतील.

७१) भारत सरकार, आयकर विभाग यांचे नियमाप्रमाणे भावबंद कराराप्रमाणे प्राप्त होणा-या रकमेवर नियमाप्रमाणे २.२% अधिभारासह आयकर ठेकेदारास देय असलेल्या रकमेतून परस्पर कपात या कार्यालयातर्फे सरकार जमा करणेत येईल.

७२) द्रवनत्र वाहतूकीचे वेळी वाहतूक मार्गात उपकेंद्राच्या ठिकाणी व द्रवनत्र भरुन घेण्याचे ठिकाणी वाहनचालक व इतर त्यांचे सहकारी सभ्य वर्तणूक ठेवतील याची ठेकेदारानी खबरदारी घ्यावी लागेल.

७३) द्रवनत्र वाहतूकीच्या कालावधीत म्हणजेच दि. १ फेब्रुवारी २०१८ ते ३१ जानेवारी २०१९ पर्यंत खात्याने पर्यायी व्यवस्था केल्यास ठेका रद्द केला जाईल.

८४) द्रवनत्र वायु हा अतिशय थंड अवस्थेत असतो. त्यामुळे वातावरणाशी संबध येताना वाफ तयार होते व ती वाफ थंड असते. हा वायु स्फोटक नाही. तथापिय वायुच्या हाताळणीची ठेकेदाराने/वाहनसोबतच्या त्याच्या प्रतिनिधींनी पूर्ण माहिती करुन घ्यावी लागेल.

७५) नियमानुसार देय पथकर ठेकेदाराने द्यावा लागेल.

७६) काही शासकीय कारणास्तव वाहतूक ठेकेदाराचे देयके वेळेवर पारित न झाल्यास कोणत्याही प्रकारे द्रवनत्र वाहतूक खंडीत होणार नाही याबाबतची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

९

७७) निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारकांनी वाहन प्रत्यक्ष तपासणीसाठी कागदपत्रासह निविदा समितीस दाखविणे आवश्यक आहे.

७८) निविदा भरतांना, निविदाधारकास नियम व अटी वाचून व त्या समजावून घेऊन त्या त्यास मान्य आहेत असे समजून त्यावर त्याची स्वाक्षरी करावी लागेल, अन्यथा निविदा फेटाळली जाईल.

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,**
**सोलापूर**

**उपरोल्लेखित १ ते ७८ या सर्व नियम व अटी मला मान्य आहेत.**

**द्रवनत्र वाहतूक आणि पशुसंवर्धन विभागासाठी आवश्यक त्या बाबींसाठी करावयाच्या वाहतूकी करिता प्रथम निविदा सन २०१७-१८**

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर यांचे कार्यालय**

१) निविदा सादर करण्याची अंतिम मुदत : दि. ९/१/२०१८ दुपारी १६:०० वाजेपर्यंत

२) निविदा उघडण्याची तारीख, वेळ : दि. ११/१/२०१८ सकाळी १०:३० वाजता

३) निविदा उघडण्याचे स्थळ : जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर यांचे कार्यालय, सोलापूर

४) निविदा कार्यान्वीत कालावधी : दि.१/२/२०१८ ते ३१/१/२०१९ किंवा पुढील वर्षाची निवीदा अंतिम होईपर्यंत.

५) निविदा उघडण्याचे वेळी निविदाकार अथवा त्याचे एक अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील त्यांनी सोबत सर्व मूळ कागदपत्रे जवळ ठेवावीत व ती मागितल्याबरोबर दाखवावी लागतील.

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **उपकेंद्रांची संख्या** | **वाहन पुरविण्याचा दिवस** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | |
| १ | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर येथील रिकामी द्रवनत्रपात्रात महाराष्ट्रातून अथवा इतर राज्यातून द्रवनत्र भरुन आणून सोलापूर जिल्हयातील उपकेंद्रांना वाटप करणे वा पशुसंवर्धन खात्यातील इतर कामांसाठी वाहन लागल्यास उपलब्ध करुन देणे. | सोलापूर जिल्हयात २१० कृत्रिम रेतन उपकेंद्रे | प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेस कार्यक्रम दिला जाईल, त्याप्रमाणे वाहन उपलब्ध करुन दयावे लागेल. द्रवनत्र वाहतूक व्यतिरिक्त वाहतुकीचे काही काम असल्यास तसे शक्य तेवढे आगाऊ कळविले जाईल. |

**दरपत्रक**

**(व्यापारी प्रपत्र)**

| निविदा धारकाचे नाव | वाहनाचा प्रकार | वाहनाचा क्रमांक | मेक | आर.टी.ओ.पासिंग दिनांक | खरेदी वर्ष | प्रति किलोमीटर दर अंकी व अक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

वाहतूकीच्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

दिनांकः सही/-

ठिकाण निवीदा धारकाचे संपूर्ण नाव

पत्ता-



## निविदाधारकाचे संमतीपत्र

**विषय** : महाराष्ट्रातून अगर महाराष्ट्र बाहेरील राज्यातील कुठल्याही ठिकाणाहून दि. १/२/२०१८ ते ३१/१/२०१९ या कालावधी करीता द्रवनत्र पात्रांमधुन द्रवनत्र भरुन आणून सोलापूर जिल्हयातील २१० कृत्रिम रेतन उपकेंद्रांना पुरवठा करण्याकरीता तसेच गरजेनुसार सांगणेत येणार तशा वाहतुकीसाठी कामाची ई-निविदा( द्रवनत्रपात्र व रेतमात्रा वाहतुकीच्या कामाची ई -निवीदा ).

संदर्भ : ई निविदा / जिपउआ / जिकृरेकें /तां/द्र.वा.नि. / / सोलापूर , दि. / /

१) निविदेतील संपुर्ण काम निविदेच्या अटी व शर्ती नुसार विहित मुदतीत पुर्ण करण्यास माझी तयारी आहे.
२) निविदेतील नमूद अटी व शर्ती मला मान्य असून त्या माझ्यावर बंधनकारक आहेत .
३) निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचून व समजून घेतल्या आहेत.
४) निविदेत नमूद केलेले दर सर्व करासहित आहेत.
५) सोबत बयाणा रक्कम म्हणून रु. १००००/- ( अक्षरी रु. दहा हजार मात्र ) व निविदा फॉर्म डाऊनलोडींग फी रु. २०००/-( अक्षरी रुपये दोन हजार मात्र ) पेमेन्ट गेटवे द्वारे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे खात्यामध्ये दिनांक **.../.../....** रोजी भरलेले आहे.
६) माझी निविदा स्विकृत झाल्यास रक्कम रूपये २५,०००/- मात्र जमानत ठेव म्हणून **जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,सोलापूर** यांचे नावाने सोलापूर येथील अनुसुचीत बँकेची रोखीत दर्शनी हुंडी ( डिपॉजीट ॲट कॉल रिसीट) स्वरुपात तात्काळ भरण्यास मी तयार आहे.
७) निविदेतील नमूद काम अटी व शर्ती नुसार न चुकता करण्याची मी हमी देत आहे. कामात काही अडचण विलंब नुकसान झाल्यास जबाबदारी माझी राहील .त्याबाबत वसुली माझे बयाणा रक्कम / सुरक्षा अनामत रक्कम मधून करण्यास माझी काहीही हरकत नाही.

**निविदाधारकाची सही शिक्का**
**निविदाधारकाचा संपुर्ण पत्ता मोबाईल नंबरसह**

## Annexure – C

## CHECK LIST TO BE SUBMITTED BY TENDERER

| Sr. No. | Description | Remark | Page No |
|---|---|---|---|
| 1 | निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे पीडीएफ फॉरमॅट मध्ये निविदाधारकाचे लेटरहेडवर विहित नमुन्यातील संमतीपत्र | Yes/ No | |
| 2 | निवीदेच्या अंतीम तारखेपर्यंत ग्राहय असलेले आयकर भरल्या संबधीचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र. | Yes/ No | |
| 3 | वाहनाचा विमा भरला असल्याची कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती. | Yes/ No | |
| 4 | वाहनकर पुस्तिका, पंजीकृत नोंदणी पुस्तिका (रजिस्ट्रेशन बुक )यांच्या साक्षांकित प्रती, माल वाहतुक परवाना | Yes/ No | |
| 5 | पी.यु.सी प्रमाणपत्र | Yes/ No | |
| 6 | पॅन कार्ड प्रत व स्वतः च्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत अकांउट नंबर,बँक कोड व आयएफसी कोडसह. | Yes/No | |
| 7 | बयाणा रक्कम म्हणून रु. १००००/- ( अक्षरी रु. दहा हजार मात्र ) व निविदा फॉर्म डाऊनलोडींग फी रु. २०००/-(अक्षरी रुपये दोन हजार मात्र) पेमेन्ट गेटवे द्वारे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे खाते क्रमांकामध्ये भरलेले आहे. | Yes/ No | |

The above details have been checked by me and are true to the best of my knowledge and belief

**Place:**

**Date:** **Signature of the tenderer**

**(Seal)**